# समाज संघटनेची गरज

मनुष्यजीवन हे केवळ एकटयाने जगण्याचे नसून तसेच केवळ प्राण्यांच्या टोळयांप्रमाणे एकत्र राहण्याचेही नाही.त्यांच्या सुखदु:खाच्या,आकांक्षाचा आरसा हेच प्रत्येकाचे कर्तव्य आहे. नि:स्वार्थ सेवाभावाने समाजकार्य करणे, समाजापुढे असलेली गंभीर आव्हाने विविधतेने भरलेल्या मागास समाजाला एकत्र करुन एका नवीन संघटनेला तयार करुन समाजाच्या चौकटीत राहुन विविध विचारसरणींना सामावून घेण्यास नेहमीच प्रयत्न झाला पाहिजे. वेगवेगहया भुमिका दृष्टिकोन ठेवणाऱ्या सर्वांच्या तक्रारी व अडचणींवर चर्चेच्या मार्गाने एकसंघपणा येण्यासाठी,ऐक्य निर्माण होण्यासाठी,ज्ञातीबांधवांची विजीगुषु वृत्ती चेतावून समाजात चैतन्याची लाट पसरवण्यासाठी समाज संघटना आवश्यक असते.

समाज संघटीत होत नाही,समाजला ‘‘ Godfather ‘‘ नाही ,पूर्वीच्या लोकांच्या चूका,गटतट,फाटफुट तसेच मोठया लोकांनी निर्माण केलेले सवते सुभे, नात्यागोत्याचे राजकारण यामुळे तरुणांनी व्यस्थित होण्याचे कारण नाही.संघटनुमेळे समाजाची आपणाला व आपली समाजाला ओळख होते.बहुतेक वेळा समाजाला शहाणपणाचा मार्ग दाखविणाऱ्या समाज वेडयात काढीत असतो.त्याची थट्टा करतो. समाज संघटनेची प्रक्रिया धिम्या गतीने पुढे जात असते.पण प्रत्यकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की प्रयत्नातील सातत्यानेच  समाज सुधारणेत यश मिळते.त्याला गरज असते ती  स्वत: इमारतीच्या पायरीचा दगड होण्याची. म्हणून माझ्या ज्ञानाप्रमाणे पुढील गोष्टीत समाज संघटनेची अत्यंत आवश्यकता आहे.

**शैक्षिणक ज्ञान :**

समाजात जर शैक्षणिक पुढारलेल्या तरुणांना मोठा दबाव असेल तर तो समाजाला दिशा देतो.इतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शक करतो.आज ‘लोणारी वेबसाईट‘ हे त्याचेच प्रतिक आहे. समाजात कोणत्या शैक्षणिक पात्रतेची किती मुले-मुली आहेत.त्यांच्याशी ओळख,आपल्या गुणवत्तेनुसार सहचराची निवड तसेच इतर विविध क्षेत्रातील अधिकारी असलेल्या

समाजबांधवांचे आपल्या पाल्यासाठी मार्गदर्शन ही अमुल्य संधीच आहे. तसे प्रयत्न करणे समाज संघटनेशिवाय शक्य नाही.

व्यवसयात,नोकरीत एकमेकांचे उत्तम दर्जाचे मार्गदर्शन,पाल्यांनी कोणत्या अभ्यास करावा ‘‘ CETAIEEE‘‘ सारख्या परीक्षा द्याव्यात,नोकरीसाटी कोठे व कसे प्रयत्न करावेत? त्यात ‘‘ MPSC‘‘ UPSC‘‘ साठी कसे प्रयत्न करावेत ? कोणत्या व्यवसायात फायदा व व्यवस्थापन ? यांचे मार्गदर्शन समाजातील त्या क्षेत्राातील गुधी,जाणकार,जेष्ठ व्यक्तींकडून उत्कुष्ठ प्रकारे सहाय्य व मार्गदर्शन समाज संघटनेच्या माध्यामातून मिळू शकते.आणि यासाठी तसे मार्गदर्शन मिळावे, घडवून आणावे लागतील. त्यासाठी संघटीत होणे अत्यंत आवश्यक आहे.

आपल्या अगदी अतिजवळ असलेल्या ज्ञानी लाकांचे ज्ञान संघटनेशिवाय होणे नाही. प्रत्येकाला हे कर्म करावेच लागेल.मी केवळ लोणारी आहे, त्या समाजात जन्माला आलो आहे.समाजासाठी काही कार्य मला करुन समाज ऋणातुन मुक्त व्हायचे आहे.समाजातील मानसात देव शोधण्याचा विचार समाजाने दिलेला आहे.आपला समाज हा उत्तम प्रकारे अनुष्ठान झालेला परधर्मापेक्षा स्वधर्म जरी आचारणास कठीण असला तरी स्वधर्मच चांगला. स्वधर्माचरण करीत असताना मरण आले तरी चांगलेच आहे. कारण परधर्म हा भयप्रद आहे.

श्रेयान स्वधर्मो विगुणः परधर्मात स्वनुष्ठितात l

स्वधर्मे निधंन श्रेय : परधर्मो भयावह ll

आणि म्हणून प्रत्येकाने एकत्र येणे समाजासाठी काही ज्ञानदान करणे हे आता प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे.दशदिशांनी येणारा ज्ञानरुपी उजेड साठवावा व मुक्त हस्ताने त्याची उधळण करावी यासाठी ज्ञानयुगातील समाजाच्या बुध्दीमान तरुणाने आता वितुष्ठाच्या भेदा पलीकडील जायला हवे हे अवघड असेल तरी अशक्य नक्कीच नाही.म्हणुन समाज संघटनेत दाखल होण्याची हाक मी आपणाला देत आहे.

आर्थिक फायदे:

समाजात जर ऐकसंघपणा असेल तर परेदशीतील समाजबांधव,समाजातील विविध व्यक्तींचे विविध व्यवसायाच्या ज्ञानाची एक उत्तम देवाण-घेवाणीची शृंखला प्रत्येक नवव्ययायिकाला उत्कुष्ठ प्रकारे प्राप्त होऊ शकतो.त्याचा फायदा त्याला त्याचे दैनंदिन कामात होऊन जीवमान उंचावून समाजातील मागे राहिलेल्या समाजबांधवांना पुढे आणण्यासाठी होतो. त्यासाठी समाजाचे दैनिक,मासिके,साप्ताहिक सुरु होणे गरजेचे आहे.प्रत्येक यशस्वी उघोजकाचे व्यवस्थापनाचे ज्ञान गरजेचे आहे.आज समाजातील तरुण वर्गाने मोठया नगर-महानगरात रंगकाम,विद्युतकाम ,इमारत बांधकाम,फौंड्री,वाजिज्य,केटरिंग,हॉटेल व्यवसाय इ.क्षेत्रात मोठया प्रमाणात यश कमावलेला आहे.काही तरुण उद्योजक घरगुती मसाले सारख्या क्षेत्रात आकाश भरारी घेत आहेत.त्यांच्या यशस्वी उद्योजगतेचे यश इतरांना मिळण्यासाठी एकमेंकांचे संघटनेतील गरज अत्यंत आवश्यक आहे.

शेती व्यवसाय,शेतमालाचे दर,शेतीमालाच्या साठवणूकीचे ज्ञान व विक्री ही समाज संघटनेमुळे एकमेकांच्या संपर्कात राहून ऐकमेकांना देता येणार नाही काय? त्यासाठी समाजाचा उद्योग-मेळावा,शेतकरी मेळावा,विद्यार्थी मेळावा घेऊन त्यांचे आर्थिक फायदे कसे मिळवावेत? याचे ज्ञान समाज संघटनेत राहून मिळवतात व देता येतील.

समाजाच्या एक संघपणामुळे अचानक उद्‌भावणाऱ्या आर्थिक मदत करणे,समाजातील गरजु लोकांना वैद्यकीय (मेडिक्लेम) फायदे मिळवुन देणे शक्य आहे,तसेच समाजाच्या पतसंस्था,बँका स्थापनकरुन उद्योग उभारण्याने जाळे निर्माण करता येईल.मैथिलीशरण गुप्त यांनी अभिनंदन ग्रंथात लिहिलेल्या प्रमाणे

अनर्थ है कि बंधु ही न बंधु की व्यथा हरे ।

वही मनुष्य है कि जो समाज के लिए मरे ।।

आर्थिक फायद्यासाठी समाज संघटनेची अत्यंत गरज आहे.‘‘ एकमेका सहाय्य करु‘‘ अवघे धरु सुपंथ‘‘ यासाठी एकत्र या व संघटनेत काम करा.असे माझे कळकळीचे आवहान मी आपणाला करीत आहे.

राजकीय फायदे:

http://www.lonari.com

(अ)आपल्या समाजातील किती लोक कोणत्या राजकीय पक्ष संघटनेत आहेत? त्यांच्यामुळे आपली कामे कशी पूर्णत्वाला नेता येतील याचे ज्ञान होते? (ब) समाजातील किती लोक विविध पदावर आहेत? (निवडुन आले आहेत)त्यांच्याकडून आपणाला कोणती मदत मिळु शकते,याचे ज्ञान आपणाला होईल.आज राजकारणात यशस्वी पदार्पण करणारे,राजकीय तारांगण पूर्ण प्रकाशमान करुन, विधानसभा,विधानपरिषद सभासद, लोकसभा सदस्य,तसेच मंत्री होऊन समाजाचे विकास सूर्य असे सर्वार्थाने समाजाचा स्वाभिमान व भुषण अजूनतरी मोठया प्रमाणावर झालेले नाहीत.पण भविष्याचे वेध असणारे उमेद तरुण आहेत.त्यांचे भविष्य उज्ज्वल आहे.त्यांचा फायदा समाज संघटनेत आपण सर्वजण एकत्र आलोत तर निश्चित होईल.

इतर समाजाने विविध राजकिय आर्थिक व सामाजिक फायदे मोठया प्रमाणात पदरात पडून घेतले आहेत व घेत आहेत. आपण ओबीसी गटात आत्तापर्यंत कोणताच सरकारी दरबारी फायदा पदरात पडून घेतलेला नाही.याचे कारण आपण संघटित नसल्याने,आपली संघटना मजबूत नसल्याने,समाजाच्या पूर्ण पाठबळाशिवाय हे होणे शक्य नाही.

नोकरीमध्ये आरक्षण,विविध महामंडळाकडून कर्ज,व्यवसाय कर्ज, शेती उद्योग, विद्युत पुरवठा,पायाभुत सवलती यासारख्या व्यवसायात आपले प्रभावहिन संघटनेमुळे आपल्या लोणारी समाजाला याचा फायदा उचलाता आलेला नाही.त्यासाठी विविध जी.आर.गॅझेट इ.अभ्यास करुन समाज आंदोलन समाज संघटनेच्या प्रेरणेने उभारणे गरजेचे आहे.नाहीतर खालील रचना तयार होईल.

‘‘लोणारी समाजाच्या सुविधांसाठी,सर्वजण एकजुटीने लढत होते।

लाटी-काटी, गोळीबारासंगे, सरकार अश्रुधूर सोडत होते।।

मोर्चेकऱ्याच्या समाजातील,जेव्हा आठशे कार्यकर्ते मेले ।

तेंव्हा मंजुर मागणी झाल्याची,घोषणा करायला मंत्री आले।।

ते म्हणाले तुमच्या समावेशाची खरच मागणी रास्त होती ।

पण अल्प संख्यांकाच्या नियमा नुसार लोणाऱ्यांची संख्या आठशेने जास्त होती ।

http://www.lonari.com

आपण या आंदोलन उभारण्यापूर्वी समाज संघटनेचे सभासद होऊन जसा पारधी हरीणाला पकढण्याच्या कचाटीत आणतो व आपले लक्ष्य तो साधतो तसे सरकारी फायदे मिळविण्यासाठी संघटनेच्या दबावातून सरकारला धारेवर धरुन आपले लक्ष्य साध्य करता येईल.

‘‘ जैसे कवळोनियां पारधी l घातेचिये संधी l आणि मृगाने बुध्दी साधावया ll

......... ज्ञानेश्वरी ३–२१५

संघटनेच्या जोरावर राजकीय फायदे मिळविण्यासाठी समुहाने उभे राहुन, ते बळकट करुन कृतीशील बनता येते.‘ टीमवर्क‘ ने काम लवकर यशस्वी होते.म्हणून प्रत्येकाने सदस्यत्व स्विकाराला हवे.

**धार्मिक फायदे:**

पृथ्वीतलावर राहणारा लोणारी समाज एकच आहे.विविध प्रांतातील भाषांनुसार नावे वेगळी असली तरी तो एकच आहे. (उदा.लिंगायत,कुणबी,देशमुख,चुना लोणारी,गाढव लोणारी,उप्पार इ.) संघटनेच्या आधारे धार्मिक समुह उभे रहातात, ते बळकट होतात व कृतीशील बनतात, समाजातील ज्ञाती बांधव यांची आडनावे,गावे अथवा प्रदेश नाते संबध व चालिरीती भाविका दाईन भावकी यांची माहिती आपणाला देवाण घेवणीमधुन मिळते आणि म्हणुन गोफ समाजाचा विणायला हवाय.तो आपला सर्व ज्ञाती बांधवांच्या मानामनात आता आला आहे.नवजेजाचे त्र रंगीबेरंगी धागे सर्व गटातटांचे,आरोग्य संपन्नतेचे, माहिती-तंत्रज्ञानाचे, साहित्य-संस्कृतीचे तसेच कला-क्रीडाचे या गोफाच्या विणकारांचे हात असतील.प्रत्येक लोणारी ज्ञातीबांधवांचे ,संघटनेत आलेल्या सभासद बनलेल्या आपल्या सर्वांचे ‘‘नाही रे आणि आहे रे ‘‘ यांच्यातील अंतर मिटविणारा समाज संघटनेचा हा गोफ समाजासाठी जणू जरतारी महावस्त्रच असेल.प्रयत्नांतील सातत्याने समाजाच्या धार्मिकतेत यश मिळते म्हणुन समाजाचे धार्मिक फायदे आज कादाचित आपणाला मिळाले नसतील पण ‘‘ काल हे सर्व जागतिक घटनांचे आणि विश्वसंहाराचे बीज आहे.काळच आपल्या शक्तीने हे विश्व खाऊन टाकतो.कधी तो बलवान असतो तर कधी दुर्बल होतो.

http://www.lonari.com

कालमुल मिदं सर्वजगदबीजं धनन्जय, काल एव समादत्ते पुनरेव यदृच्छाया l

स एव बलवान भूत्वा, पुनर्भवति दुर्बल: ll ..... म.भा.कौसाल ८.३३-१४

मागील गोष्टीच्या चुका, उणीवा काढुन एकमेकावर अविश्वास दाखवुन संघटनेत न येणे हे ही एक पाप ठरेल.कारण तो काळ आता इतिहासजमा झाला आहे.नवीन पहाट आपणाला बोलावित आहे.म्हणून ‘‘ उठा जागे व्हा रे आता आणि संघटनेत सामिल व्हा. ‘‘ समाज संघटनेचे कार्ये कायमस्वरुपी रहावे,टिकावे म्हणून समाज संघटीत होण्यासाठी सदस्य होणे अत्यंत गरजेचे आहे.

आज समाजाकडे असणाऱ्या इमारती,पैसा,जमिनी,मठ,इतर वस्तु हे इतर समाजाचे लोक बळकावित आहेत.किंबहुना त्या जागेचे अथवा वास्तुचे त्यांनी कायम स्वरुपी मालकी हक्क प्रस्थापित करु लागले आहेत.समाजाचा व समाज संघटनेचा प्रभाव कमी असल्याने, अंतर्गत हेवेदावे, गट-तट, नात्यागोत्यांचे राजकारण, यामुळे समाजाचे आतोनात कधीही भरुन न येणारे नुकसान होत आहे.त्या संपत्तीचे जतन करणे, इतर ठिकाणी शासकिय जागा मिळविणे, मोठया महानगरात समाजाची वसतीगृहे सीापन करणे ही आता काळाची गरज आहे. ज्या ठिकाणी आपल्या समाजाच्या संपत्ती बळकावल्या आहेत, त्या परत मिळविणे,कोर्टकचेऱ्यांसाठी समाज संघटनेला सहय्य लोकांनी संघटनेत सामील होऊन समाजाचे ऋणातून मुक्त होण्याची हीच वेळ आहे.आपले कर्तव्य आपण विसरलो तर भविष्याकाळ आपणाला कधीच क्षमा करणार नाही.

प्रत्येकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की संकटे नसलेल्या काळात जो स्वत:च्या धर्माचा अशा प्रकारे एकीने न राहाता छळ करतो व त्याग करतो त्याला विव्दान लोक पतित म्हणतात.

स्वधर्म य: समुत्सुज्य परधर्म समाचरेत l

टनापदि स विव्दव्दी पतित: परिकीर्त्य ते ll ...... वामनपुराण १४.८९

स्माजविरोधी कृत्य करणाऱ्या भविष्यात इतिहास कधीच माफ करीत नसतो हे ही एक त्रिकालवधीत सत्यच आहे. त्यासाठी समाज कार्यात कै.दादरेसाहेबांसारखा मृत्यु आला तरी घाबरु नका कारण

http://www.lonari.com

http://www.lonari.com

**मरणाने भय नुरते l मरणात जगणे असते ll**

**लोणारी समाजासाठी झिजणे l हे मरणाने जिवंत मरणे ll**

**वरील सर्व गोष्टींचा विचार प्रत्येकाने गांभीर्याने करुन आपण ‘‘ अखिल लोणारी समाज सेवा संघाचे ‘‘ सभासद व्हावे.आपले सर्वांचे स्वागत करण्यास आम्ही उत्सुक आहोत. सभासद होण्याचे मी आपणास नम्र, आवाहन करतो.**

**जय हिंद .... जय महाराष्ट्र ... जय लोणारी समाज.....**

**धन्यवाद**

**प्रा.श्री.होळकर रविंद्र नाथासाहेब**

**(उपाध्यक्ष पुणे आ.लो.स.संघ )**

**एम.ए.बी.एड्(इंग्रजी)**

**हडपसर , पुणे**

**संपर्क : ९८८१३३८७९२**

http://www.lonari.com